# महाराष्ट्र राज्य वीज निर्मीती कंपनी मर्यादित

## औष्णिक विद्युत केंद्र पारस

### जाहिरात

केंद्रीय पर्यावरण व वनखात्याचे अधिसुचनेनुसार पारस औष्णिक विद्युत केंद्रामधुन उपलब्ध असलेल्या कोरडया राखेपैकी २० टक्के राखीव कोरडया राखे (फ्लॉय ॲश) मधुन राख मिळण्याकरीता खालील गोष्टीची पुर्तता करणा-या उद्योग/समुह/व्यक्ती यांचेकडून अर्ज मागविण्यात येत आहेत.

१) अर्जदाराने कोरडया राखेचा उपयोग विटा,ब्लॉक्स,टाईल्स व घर बांधकाम या साठीचे ईतर साहित्य तयार करण्यासाठी करावा.

२) अर्जदाराने अर्जामध्ये प्रती महिने वापरासाठी लागणा-या राखेची मात्रा मे.टन मध्ये ठळकपणे नमुद करावी. सदर मात्रा आपल्या यांत्रिक उत्पादन क्षमतेच्या सुसंगत असावी.

३) अर्जदाराने अर्जासोबत खालील कागदपत्रे राजपत्रित अधिका-याकडून सांक्षाकीत करुन जोडावीत.

३.१) जिल्हा उद्योग केंद्राचे राखेच्या विटा,राख निर्मीती विटा किंवा ब्लॉक्स टाईल्स व घर बांधकाम या साठीचे इतर साहित्य बनविण्याचे नोंदणी प्रमाणपत्र लघु उद्योजक म्हणुन याची नोंद ऑनलाईन झालेली असावी.

३.२) उद्योगाचे वस्तु व सेवा कर प्रमानपत्र (जिएसटी सर्टीफिकिट)

३.३) कोरडी राख वापरण्याचे प्रमाणपत्र (नोटरी आवश्यक)

३.४) उद्योग जेथे कार्यरत आहे तेथील ग्रामपंचायत/नगरपालीका/महानगरपालीका यांचा नाहरकत दाखला.

३.५) उद्योगाच्या ठिकाणचा असलेला ७/१२ चा उतारा (अद्यावत असावा)

३.६) उद्योगाच्या किंवा मालकाच्या नावाचे पॅन कार्ड.

३.७) उद्योग असलेल्या ठिकाणचे अद्यावत विज बिल.

३.८) उद्योगाचे विक्रीचलन (वस्तु व सेवा करासह)

३.९) पारस औष्णिक विद्युत केंद्रापासुन उद्योगाचे अंतर दर्शविणारा नकाशा.

४) वरील सर्व अटीची पूर्तता तथा खात्री केल्यानंतर महानिर्मीतीच्या अटी व शर्तीनुसार कोरडी राख उचलण्या संदर्भात परवानगी देण्यात येईल.

५) राख उचलताना तसेच वाहतुक करतांना महाराष्ट्र प्रदुषक नियत्रण मंडळ वाहतुकीचे तसेच महानिर्मीतीच्या सर्व नियमांचे व अटीचे पालन करणे अर्जदारास बंधनकारक राहिल. अटी व शर्ती तसेच नमुन्यातील महानिर्मीतीच्या संकेत स्थळ **www.mahagenco.in** वर उपलब्ध असुन विहित नमुन्यातील अर्ज स्वीकारले जातील याची नोंद घ्यावी.

६) राख उचलण्याचा कालावधी हा एका वर्षाचा असेल खालील सही करणारा हे राख उचलण्याचे प्रमाण तथा कालावधी कमी किंवा जास्त करणे हा अधिकार स्वत:कडे राखून ठेवतील. खालील सही करणारा याचा निर्णय हा सर्वस्वी अर्जदारावर बंधनकारक राहील.

७) अर्जदारास अनामत रक्कमेपोटी रु ५०,००० ( रुपये पन्नास हजार फक्त) भरावे लागतील. जे परतावा योग्य असतील व राख उचलण्याचा कालावधी/काम पुर्ण झाल्यावर सदरहू रक्कम परत दिली जाईल. तसेच अर्जदारास उचललेल्या कोरडया राखेवर प्रती मेंट्रीक टन मुख्य कार्यालयाने ठरवुन दिलेले पायाभूत सुधारणा शुल्क (**इन्फ्रास्ट्रक्चर डेव्हलपमेन्ट चार्जेस**) राखेच्या मात्रेप्रमाणे पारस औष्णिक विद्युत केंद्राकडे प्रत्येक महिन्यापुर्वी अगाउ रक्कम म्हणून भरावे लागतील.

८) खालील सही करणार हे राख उचलण्याची परवानगी/संबधीत जाहीरात कोनत्याही क्षणी थांबविण्याचा किंवा रद्द करण्याचा अधिकार राखुन ठेवतात.या संदर्भात कोणताही पत्रव्यवहार केला जानार नाही.

९) एक कंपनी किंवा समुह/कंपनी हे एकच अर्ज करु शकतील जर या समुहातील एखाद्या व्यक्तीने स्वतत्रपणे अर्ज केला असेल तर तो अर्ज बाद करण्यात येईल व फक्त समुहाचा अर्ज विचारात घेतला जाईल.

१०) औष्णिक विद्युत केंद्रापासुन ३०० कि.मी. अंतरापर्यन्त असणा-यांना प्राधान्य देण्यात येईल.

वरिल पुर्तता करणा-या इच्छुक अर्जदाराने आपले अर्ज वर मुद्दा क्र.३ मधील उल्लेख केलेल्या सर्व कागदपत्रासह सील बंद लिफाफ्यात उपमुख्य अभियंता (प्रशासन) पारस विद्युत केंद्र पारस यांचेकडे दिनांक १०/०९/२०२१ रोजी दुपारी ५:०० वाजेपर्यन्त अर्ज सादर करावेत. लिफाफ्यावर अर्जदाराचे नांव,संपर्क क्रंमाक व ‘२० टक्के कोरडया राखेसाठी अर्ज’ असे नमुद करावे या तारखेनंतर आलेल्या अर्जाचा विचार केला जाणार नाही.

मुख्य अभियंता (सं व सु)
पारस औ.वि.केंद्र, पारस